UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

**पुरवणी अंक १ – मार्च २०२३ (त्रैमासिक)**

- शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : १

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. सुरेश ढेरे • डॉ. नागोराव भुरके • प्रा. निलोफर तांबोळी

**✵ प्रकाशक ✵**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२५. **Indian Government Thoughts and Policies for Ethanol Production and itsimpact on the Indian Economy**
- Prof. Honmane Vanita Vijay ---------- ११५

२६. **Influence of Gandhian Thoughts on Indian English Writing : A study of selected Novels**
- Mrs.Nilofar A.Gani Tamboli ---------- ११९

२७. **Thoughts of Savitribai Phule on Rural Women Education and Empowerment**
- Mrs. Kodam Aruna Govardhan ---------- १२३

२८. **डॉ.राममनोहर लोहिया यांचे स्त्रीविषयक विचार**
- प्रा.डॉ.भुरके नागोराव संभाजी ---------- १२७

२९. **आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांचे योगदान**
- डॉ. विजय रेवजे ---------- १३१

३०. **महात्मा फुल्यांचे शैक्षणिक विकासातील योगदान**
- डॉ. कन्नाडे ममता कार्तिक ---------- १३५

३१. **महाराष्ट्राच्या समाज सुधारणातील प्रसार माध्यमांची भूमिका**
- सुनिल कल्याण विधाते, डॉ. प्रदीप महादेव जगताप ---------- १४०

३२. **भारतातील समाज सुधारक महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार**
- डॉ. गणेश एन. बहादे ---------- १४५

३३. **समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांचे कार्य**
- डॉ. चंद्रशेखर आर. भेजे ---------- १४९

३४. **महिला सबलीकरण आणि राजर्षी शाहू महाराज**
- डॉ. प्रदीप महादेव जगताप, सुधीर रामचंद्र धोंगडे ---------- १५४

३५. **राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि सध्याची भारताची आर्थिक–सामाजिक परिस्थिती**
- डॉ. युवराज सुरवसे ---------- १५७

३६. **महात्मा फुले यांचा समतावादी विचार**
- डॉ. रविकांत शिंदे ---------- १६०

३७. **महात्मा फुलेंचे शैक्षणिक व सामाजिक कार्य**
- डॉ. रामेश्वर एम. मोरे ---------- १६३

ISSN No. 2394-5990

# महात्मा फुल्यांचे शैक्षणिक विकासातील योगदान

डॉ. कन्नाडे ममता कार्तिक
सहा. प्राध्यापिका
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
Email:swamimamata@gmail.com

**गोषवारा:**

आपल्या देशातील स्त्रियांना धर्मातील तत्त्वामुळे शिक्षण बंदी होती. महात्मा जोतीबा फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी भारत देशातील पहिली मुलींची शाळा पुणे येथील भिडे वाड्यात सुरु केली. स्वतःच्या घरातील पैशातून व समाजातून देणगी उभी करुन विना अनुदानित तत्त्वावर जोतीबांनी सर्व शाळा चालवल्या. समाज-जीवनाच्या गरजा, आशाआकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जेव्हा अतूट संबंध तयार होतो तेव्हाच शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे परिणामकारक हत्यार बनते. जोतीरावांचे शिक्षणविषयक कार्य, शिक्षणाबद्दलचे त्यांचे विचार व तत्त्वज्ञान, त्यांनी व सावित्रीबाईंनी शिक्षणविषयक केलेले प्रयोग, इत्यादींचा विचार केला म्हणजे जोतीरावांचे समाजबदलासाठी शिक्षणविषयक धोरणाचे व कार्याचे वेगळेपण लक्षात येते.समाजाचे आपण काही देणे लागतो, माणसाच्या सुखदुःखाशी आपले अतूट नाते आहे ही भावना महात्मा फुले यांच्या मनात सदैव होती. १९व्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडित होते त्यापैकी महात्मा फुले हे एक होते.

**प्रस्तावना :**

शिक्षण म्हणजे वर्तनात परिवर्तन. शिक्षण हा शब्द व्यापक असल्याने तो मानवी मनाचा मन, मेंदू, मनगट तसेच मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोगी आहे. शिक्षण हे मानवाच्या सर्व अंगाशी निगडीत असल्यामुळे मानवाचा शिक्षणाशिवाय उत्कर्ष नाही कारण शिक्षण हे एक असे चल आहे की ते मानसाला मानसात आणण्याची महत्वपूर्ण क्रिया पार पाडते. मानवाला इतर प्राणीमात्रांपासून वेगळे करते. एकूण मानव जातीचे सर्वांगीण कल्याण हे शिक्षणातच आहे, सत्यम् शिवम् सुंदरम् म्हणजे शिक्षण आहे. शिक्षण हीएक शक्ती आहे. मानव इतर सजीवांपेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण ठरला तो त्याच्या ज्ञानसाधनेमुळेच. शिक्षण हे समाज बदलण्याचे प्रभावी साधन आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुल्यांना गुरुस्थानी मानून अस्पृश्यांना परिवर्तनाचा जो मंत्र दिला तो शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणारा होता. कर्मकाडांच्या सोवळ्या ओवळ्याच्या, तथाकथित धर्ममार्तंडांच्या स्वार्थाचे साधन बनून वैदिक धर्माने जेव्हा सामान्यांच्या जीवनाची कोंडी केली, तेव्हाही गौतमबुद्धाने मअत्त दीपो भवफ हा दिलेला मंत्र शिक्षणाचे सामर्थ्य प्रकट करणारा होता. बदलत्या समाजाबरोबर शिक्षणपद्धतीत, तिच्या आशयात बदल होत आले असले, ती अधिक व्यापक व विकसनशील होत असली तरी हे बदल सुखासुखी झाले नाहीत. धर्ममार्तंडांच्या, पुराणमतवाद्यांच्या, पुरोहितशाहीच्या हिताचे रक्षण करणारी समाजव्यवस्था व तिच्या अनुषंगाने शिक्षणव्यवस्था बदलत असताना या प्रस्थापित वर्गाने कडवा विरोध केला. या संघर्षातूनच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एका क्रांतिकारी पर्वाला आरंभ झाला. त्यातूनच अनेक क्रांत्यांनी व क्रांतिकारकांनी जन्म घेतला. शिक्षण व शिक्षणपद्धतीत अधिक प्रगत स्वरूपाचा घडून येणारा बदल बहुजनांच्या हिताचा असतो. येथेही संघर्ष अटळ असतो. ते एक प्रकारचे क्रांतिकार्य असते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा जोतीराव फुल्यांनी अशीच शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महात्मा फुले यांचा प्राथमिक शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
२. म. फुले यांचे शैक्षणिक विचार आणि त्याची आधुनिक काळातील उपयुक्तता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अभ्यास विषय हा प्रामुख्याने दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. या संदर्भातील माहिती संकलनासाठी विविध पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे इ. चा वापर केला आहे.

**शैक्षणिक कार्याची सुरुवात :**

जोतीराव फुल्यांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरुवात इ.स. १८४८मध्ये शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन करून केली.